-: प्रेसनोट दिनांक- २४/०८/२०२१ :-

खाजगी इमस भिकाजी महादेव कुराडे, वय ५५, त्यांचा मुलगा सारंग भिकाजी कुराडे, वय २६, दोघे रा. साईनगर, मु. पो. चंदुर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, व खाजगी इसम इम्रान मुसा शेख, वय ४१, रा. १०० फुटी रोड, सांगली, ता. मिरज, जि. सांगली यांनी लाच स्विकारलेबाबत.........

---

यातील तक्रारदार यांचे वडीलार्जित शेतजमिनीबाबत दिवाणी वाद चालु आहे. सदरचा दावा अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचे समक्ष अपिल क्र. ४१२/०१८ व अपिल क्र. ४६४/२०१८ प्रमाणे सुनवणीवर प्रलंबित आहे. सदर जमिनीचे दाव्याचा निकाल अपर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना सांगुन तक्रारदार यांचे बाजुने लावुन देण्यासाठी यातील खाजगी इसम भिकाजी कुराडे याने एकुण ५ लाख रूपयेची मागणी करून त्यापैकी २ लाख रूपये यापुर्वी स्विकारून उर्वरित ३ लाख रूपये तक्रारदार यांचेकडे मागणी करत असल्याने तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार केली.

तक्रारीप्रमाणे खाजगी इसम भिकाजी कुराडे यांचे लाच मागणीची पडताळणी केली असता त्याने तक्रारदार यांचे जमिनीचे दाव्याचा निकाल अप्पर जिल्हाधिकारी यांना सांगुन त्यांचे बाजुन लावुन देण्यासाठी ३ लाख रूपयेची मागणी केली. पडताळणी दरम्यान खाजगी इसम भिकाजी कुराडे यांचे लाच मागणीस त्यांचा मुलगा सारंग व खाजगी इसम इम्रान यांनी प्रोत्साहन दिलेचे निष्पन्न झाले.

त्याप्रमाणे सापळा कारवाई आयोजीत केली असता दिनांक २४/०८/२०२१ रोजी इचलकरंजी येथील शिवाजी महाराज पुतळा चौकातील रिझ कोल्ड्रींग हाउस व बेकर्स् येथे शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचे जमिनीचा दाव्याचा निकाल त्यांचे बाजुने लावुन देण्यासाठी खाजगी इसम भिकाजी कुराडे याने ३ लाख रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडणेत आलेले आहे. सदरबाबत खाजगी इमस भिकाजी महादेव कुराडे, वय ५५, त्यांचा मुलगा सारंग भिकाजी कुराडे, वय २६, दोघे रा. साईनगर, मु. पो. चंदुर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, व खाजगी इसम इम्रान मुसा शेख, वय ४१, रा. १०० फुटी रोड, सांगली, ता. मिरज, जि. सांगली यांचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करणेची प्रकिया सुरू आहे.

**सदरची कारवाई मा.श्री. राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा.श्री सुहास नाडगोडा, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर, पोहेकॉ शरद पोरे, पोना विकास माने, पोना नवनाथ कदम, पोकॉ मयुर देसाई, पोकॉ संदीप पडवळ, चालक पोहेकॉ सुरज अपराध ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.**

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १/८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,**

**४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**५)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,**

**६) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

Scanned by TapScanner